महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
# प्रादेशिक कार्यालय, घोले रोड, पुणे - ४११ ००५

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

e-mail : est.ropune@dvet.gov.in Phone No.२५५३५४१५/१६.

जा.क्र. अ-१/आस्था/अंसेजे/२०२५/ 2242 दिनांक :- 21 APR 2025

परिपत्रक :-

विषय :- दिनांक ०१/०१/२०२५ रोजी कार्यरत असलेल्या विविध संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या अंतिम सेवाजेष्ठता याद्या प्रसिध्द करणेबाबत...

संदर्भ :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,अधिसूचना, दिनांक २१/०६/२०२१.
२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. अ-१/आस्था/तासेजे/२०२५/११५०, दि.२०/०२/२०२५

उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये या कार्यालयाच्या अधिपत्याखालील संस्था/कार्यालयामध्ये दिनांक ०१-०१-२०२५ रोजी कार्यरत असलेल्या विविध संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या तात्पुरत्या सेवाजेष्ठता याद्या संदर्भित परिपत्रकान्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या. सदरच्या यादी संदर्भात या कार्यालयास प्राप्त झालेल्या आक्षेप/हरकती संदर्भात संबंधित संस्थेतील कर्मचाऱ्यांशी पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे. या परिपत्रकान्वये खाली नमुद केलेल्या विविध संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या शिल्पनिदेशक व गणित तथा चित्रकला निदेशक (शिल्प निदेशक / व्यवसाय निदेशक व गणित तथा चित्रकला निदेशक (पदोन्नतीकरीता)) हा सवंर्ग वगळून अंतिम सेवाजेष्ठता यादया प्रसिध्द करण्यात येत आहेत.

गणित तथा चित्रकला निदेशक कर्मचारी यांचे सेवाज्येष्ठता दिनांक ग्राहय धरणेबाबत संचालनालय,मुंबई यांचे मार्गदर्शन /सूचना प्राप्त झालेनंतरच गणित तथा चित्रकला निदेशक या संवर्गाचे अंतिम सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेत येतील.

| अ.क्र. | पदाचा संवर्ग | वेतनस्तर |
|---|---|---|
| १ | पूर्णवेळ शिक्षक (द्विलक्षी/कि.कौ.) | एस-१६ : ४४९०० - १४२४०० |
| २ | कनिष्ठ सर्वेक्षक-नि-कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक) | एस-१५ : ४१८०० - १३२३०० |
| ३ | पूर्णवेळ शिक्षक (प्रात्याक्षिक) (द्विलक्षी/कि.कौ.) | एस-१४ : ३८६०० - १२२८०० |
| ४ | सहाय्यक अधिव्याख्याता | एस-१४ : ३८६०० - १२२८०० |
| ५ | पूर्णवेळ शिक्षक (प्रात्याक्षिक) (द्विलक्षी/कि.कौ.) / सहाय्यक अधिव्याख्याता (पदोन्नतीकरीता) | एस-१४ : ३८६०० - १२२८०० |
| ६ | निदेशक (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम) (मेकॅनिकल) / (इलेक्ट्रीकल) | एस-१० : २९२०० - ९२३०० |
| ७ | मिलराईट मेन्टेनन्स मेकॅनिक (मेकॅनिकल) / (इलेक्ट्रीकल) / (इलेक्ट्रॉनिक्स) | एस-१० : २९२०० - ९२३०० |
| ८ | मिलराईट मेन्टेनन्स मेकॅनिक (मेकॅनिकल) / (इलेक्ट्रीकल) / (इलेक्ट्रॉनिक्स) व निदेशक (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम) (मेकॅनिकल) / (इलेक्ट्रीकल) (पदोन्नतीकरीता) | एस-१० : २९२०० - ९२३०० |
| ९ | गटनिदेशक | एस-१५ : ४१८०० - १३२३०० |
| १० | अधिक्षक (तांत्रिक) | एस-१४ : ३८६०० - १२२८०० |
| ११ | भांडार अधिक्षक | एस-१४ : ३८६०० - १२२८०० |
| १२ | अधिक्षक (तांत्रिक) व भांडार अधिक्षक (पदोन्नतीकरीता) | एस-१४ : ३८६०० - १२२८०० |
| १३ | वसतिगृह अधिक्षक | एस-१० : २९२०० - ९२३०० |
| १४ | कार्यालय अधिक्षक | एस-१४ : ३८६०० - १२२८०० |
| १५ | मुख्य लिपिक | एस-१३ : ३५४०० - ११२४०० |
| १६ | वरिष्ठ लिपिक | एस-०८ : २५५०० - ८११०० |
| १७ | लिपिक-नि-टंकलेखक / लिपिक-नि-टंकलेखक (वसतिगृहाकरिता) | एस-०६ : १९९०० - ६३२०० |
| १८ | वाहन चालक | एस-०६ : १९९०० - ६३२०० |
| १९ | भांडारपाल | एस-१० : २९२०० - ९२३०० |
| २० | सहाय्यक भांडारपाल | एस-०६ : १९९०० - ६३२०० |
| २१ | चतुर्थश्रेणी कर्मचारी | एस-०१ : १५००० - ४७६०० |

(मागे पहा)

सदरच्या अंतिम सेवाजेष्ठता यादया या कार्यालयाच्या संकेतस्थळावर https://pune.dvet.gov.in / ई-मेलद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तरी संस्था/कार्यालय प्रमुखांना सूचित करण्यात येते की, त्यांनी संस्थेत कार्यरत असलेल्या सर्व संबंधित कर्मचाऱ्यांच्या अंतिम सेवाजेष्ठता यादया डाऊनलोड करुन संबंधित कर्मचाऱ्यांचे (रजेवर, प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचाऱ्यांसह) निदर्शनास आणून द्याव्यात व तशी पोहोच कर्मचाऱ्यांकडून घेऊन कार्यालयाच्या अभिलेखावर ठेवण्यात यावी.

या परिपत्रकाची पोहोच देण्यात यावी.

(सी.जे.ढेकणे)
प्र.सहसंचालक
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, पुणे

सोबत :- अंतिम सेवाज्येष्ठता याद्या.

प्रत :- या कार्यालयाच्या अधिपत्याखालील संबंधित संस्था/कार्यालय प्रमुखांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
प्रत :- या कार्यालयातील सर्व संबंधित कर्मचारी यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत :- मा.संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१
यांना माहितीसाठी सविनय सादर. (कार्यासन क्रमांक ४)